जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा मान्यता

पोआर,

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,

पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- २.२.९४

प्रति,

अध्यक्ष,

कुरलेकर समाज प्रबोधन संस्था

हडपसर पुणे २८

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

===========================================

संदर्भ :- शासन शालेय शिक्षण विभागाकडील क्र. व्हीएलएस-१०९३/[७१४०]/प्राशि-३ दि. २०/१२/९३ व क्र. व्हीएलएस-१०९३/[७१३२]प्राशि ३ दि. २०/१/९४

वरील विषयाचे संदर्भामधील शासनाकडील संदर्भाधिन पत्रान्वये आपल्या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या सय्यदनगर पुणे या ठिकाणावरील खाजगी प्राथमिक शाळेस ~~मराठी~~/इंग्रजी माध्यमातून सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षी परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र ही परवानगी शासनाने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होत असल्यास शासनाने दिलेली असल्याने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होते किंवा कसे याबाबतचा अहवाल आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी [प्राथमिक] जिल्हा परिषद प्रशासन अधिकारी, न. पा. शि. मं. यांचेकडे विनाविलंब सादर करून त्याची एक प्रत या कार्यालयाकडे परस्पर सादर करावी. म्हणजे परवानगी देणेबाबतची पुढील कार्यवाही या कार्यालयास सादर करता येईल.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत करावी.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

..२..

३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखादा शाळेची [illegible] काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे.

७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु.१००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहीत मान्य शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

१०] शाळेमध्ये प्रत्यक्ष सुरू असलेले वर्ग व त्यातील विद्यार्थी संख्या कळवावी.

११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संस्था उघडणार नाही असे संस्थेने रु.१०/- च्या स्टँप पेपरवर लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१२] शासनाने ज्या माध्यमातून शाळा काढण्यास परवानगी देण्यात येणार आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संस्था/शाळा उघडणार नाही याची हमी रु.१०/-च्या स्टँप पेपरवर द्यावी.

१३] इंग्रजी माध्यमातून परवानगी द्यावयाच्या शाळांच्या संस्थांनी रु.२५,०००/-[रुपये पंचवीस हजार फक्त] अनामत रक्कम शासनाकडे जमा करावी लागेल. तरी त्याबाबतचे प्रथमतः हमीपत्र देण्यात यावे. ही रक्कम परवानगीचे पत्र मिळालेनंतर दोन आठवड्यात शासनाकडे जमा करावयाची आहे.

वरील अटींची पूर्तता होत असलेबाबतची माहिती सर्व कागदपत्रांसह शिक्षणाधिकारी [प्राथ] जि.प./प्रशासन अधिकारी न.पा. शि.मं यांचेकडे त्वरित सादर करावी म्हणजे पुढील कार्यवाही त्वरित करता येईल.

[signature]
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत-
१. शिक्षणाधिकारी [प्राथ.] जि.प. पुणे विभाग
२. प्रशासन अधिकारी, न.पा. शि.मं. पुणे विभाग, यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- १४.६.९४

प्रति,
शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग),
जिल्हा परिषद पुणे-११

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस-१०९३/(५१३२)/प्राशि-३ दिनांक २०.१.९४ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातुन जून १९९३ पासुन इ. १ली ते सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरू असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीत प्राथमिक शाळा सुरू करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणुन परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| १) मुस्लिम समाज प्रबोधन संस्था, सय्यदनगर पुणे-२८ | सय्यदनगर, ता. हवेली | जुन १९९३ मध्ये इ. १ली ते शाळेमध्ये प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस. | उर्दू |

२.१ सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२. शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकुल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३. शाळेत, शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्यात सेवाशर्तींच्या अधिन राहुन नेमला पाहिजे.

..२..

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५. संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

२.६. संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचा-यांसाठी विहित नोंद वह्या अद्ययावत आणि विश्वसार्ह स्वरूपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७. संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षकानुकुल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशिरपणा नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे कार्यपध्दतीचे नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२. शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज समक्ष क्षेत्रिय अधिका-याकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.०० इंग्रजीमाध्यमाच्या प्राथमिक शाळेसाठी रू. २५०००/-[रू. पंचवीस हजार फक्त]अनामत रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची ~~खात्री~~ पुर्तता करून घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणेनोंदणी कृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैर व्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा. ]

७] शासनाची मंजुरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु.१००/-दंडसंस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा.

सही/-
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत-
प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे
जिल्हा---पुणे---यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत-
मा. सचिव- मुस्लीम समाज प्रबोधन संस्था, आझमनगर, पुणे. २८.
---यांना माहितीसाठी अग्रेषित.

रवानी प्रत

[illegible]

School Consultant,
Dy. Director of Education
Pune Region Pune 1.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [प्राथ]
जा. क्रं. जिप/शिक्षण/प्राथ/हौन/७/२७२/९९
पुणे-१ दिनांक - १०.५.१९९९

प्रति,
मुख्याध्यापक,
शमसुद्दीन-इनामदार उर्दू प्राथ
---------------

विषय:- सन १९९८-९९ मध्ये विना अनुदानित खाजगी प्राथ. शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] टप्याटप्याने अनुदान मंजूर करणे बाबत.

संदर्भ:- मा. शिक्षण उप-संचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्रं. प्रा/प्राशि-
-शेप्राशा/अनुदान/जीआर दिनांक ३१.३.९९

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने खालील अटीच्या पूर्ततेचे अधिन राहून आपले शाळेत सन १९९८-९९ पासून २५% टक्के अनुदान मंजूर करणेत येत आहेत. त्या पुढील वर्षी आपली शाळा टप्याटप्याने अनुदानावर येण्यास पात्र राहील.

१] शासन शिक्षण विभागाकडील निर्णय दिनांक ८.२.७४ मधील अनुदानाच्या निकषानुसार पूर्तता होणे आवश्यक आहे.

२] संबंधित संस्थेने/शाळेने शासनाविरुद्ध न्यायालयामध्ये अनुदाना बाबत दावा/याचिका दाखल केलेली नसावी.

३] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या अथवा कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्या बाबतच्या तक्रारी नसाव्यात.

४] शाळेतील मंजूर वर्गाची नियमानुसार सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली असली पाहिजे.

५] शाळेमध्ये पूर्व परवानगी शिवाय अन्य वर्ग / तुकडया सुरु करु नयेत.

६] शासनाकडून वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे संस्थेने / शाळेने पालन करावे.

७] शाळेमध्ये प्राथमिक शिक्षकासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता विहीत वयो - मर्यादा असलेले शिक्षक नेमणे आवश्यक आहे. शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची भरती करताना मागास वर्गीयांचे योग्य प्रमाणानुसार नेमणूका कराव्या. मागास वर्गीय अनुशेष शिल्लक असल्यास तेथपर्यंत खुल्या संवर्गातील सेवा कनिष्ठ कर्मचाऱ्यांना दिली जाणार नाही.

८] शाळेमध्ये शैक्षणिक दृष्टया पात्र असणाऱ्या शिक्षकाचेच वेतन मान्य करण्यात आलेले आहे.

९] आपल्या शाळेस एकूण ----४---- वर्ग व ----४------शिक्षक मान्य करण्यांत आलेले आहेत.

शिक्षणाधिकारी [प्राथ]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

प्रत - सचिव-मुस्लीम समाज प्रबोधन संस्था
सय्यदनगर हडपसर पुणे २८.
शब/९९